

# शंभरावी माळ!

'इंडियन कार्टून गॅलरी' या बंगळुरुमधील व्यंगचित्रकारांच्या संस्थेने नुकतेच शंभरावे प्रदर्शन आयोजित केले होते. त्यानिमित्त गेल्या सात वर्षात एवढा पल्ला गाठणाऱ्या या संस्थेच्या कामाचा एका ज्येष्ठ व्यंगचित्रकाराने घेतलेला आढावा-

- प्रभाकर वाईरकर



चित्रकला हे ६४ कलांमधील महत्त्वाचे अंग. चित्रकलेच्या वृक्षाचा कोंब भुईतून फुटून जोमाने बाहेर पडला आणि त्याला अनेक 'वादां' (इझमस्)च्या फांद्या फुटल्या. जसे, वास्तववाद, अमूर्तवाद, क्युबिझम वगैरे... साधारण हे झाड बाराव्या शतकापासून जोमाने वाढू लागले आणि सोळा-सतराव्या शतकामध्ये उपहासात्मक वर्णन करण्याजोगी एक फांदी त्या झाडाला फुटू लागली. म्हणजेच व्यंगचित्रकलासदृश्य कलेचा जन्म झाला, परंतु पूर्णतः व्यंगचित्रकलेचा आकार निर्माण होण्यास अठरावे शतक उजाडावे लागले.

इटालियन शब्द 'CARTONE' म्हणजेच सुरुवातीचे स्केच तयार करण्यासाठी लागणारा मोठ्ठा पेपर वा फ्रेस्को पेंटिंग. ब्रिटनच्या पार्लमेंटसाठी वॉल पेंटिंग तयार करण्यासाठी एक स्पर्धा आयोजित केली १८४३ साली. त्या स्पर्धेत समाविष्ट केलेल्या चित्रांचे CARTONES









विडंबनात्मक चित्रांकन चित्रकार व चित्रपरीक्षक जॉन लीच याने केले व ती विडंबनात्मक चित्रे ब्रिटनमधील 'पंच' या मॅगेझिनने प्रसिद्ध केली व त्याला 'पंच कार्टून्स' हे नाव पडले. त्यानंतर 'कार्टून' हा शब्द प्रचलित झाला. त्याचप्रमाणे इटालियन 'ॲनिबल करास्सी' या बंधूनी व्यक्तिचित्रणामध्ये आकारामध्ये अतिशयोक्तीचा (exaggerated) व विनोद निर्माण होईल अशा आकार व रेषांचा वापर करून व्यक्तिचित्र तयार केले व त्याला नाव पडले 'कॅरिकेचर'. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून ते विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळामध्ये व्यंगचित्रांना जगामध्ये मानाचे स्थान दिले. त्यामध्ये इंग्लंडमधील 'पंच', 'लाइफ' व अमेरिकन 'जज' (judge) या नियतकालिकांनी.

व्यंगचित्र हे समाजाची उपहासात्मक प्रतिमा असलेला आरसा आहे. पंडित नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, "व्यंगचित्रकार हा फक्त गमतीजमती करणारा नसून त्याने प्रत्येक घटनेमधील गर्भाचे महत्त्व आपल्या ब्रशच्या काही फटकाऱ्यांमध्ये मांडून जगाचे लक्ष वेधले पाहिजे."

व्यंगचित्रकला हे साहित्य आहे. साहित्याचे सर्व गुण त्यामध्ये आहेत. चित्रामध्ये मांडलेले विचार हे साहित्य, तर रेषा, आकार, रंग हे त्याचे व्याकरण आहे. व्यंगचित्रांची छाप सर्व सामाजिक स्तरावर पडलेली आढळते. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, खेळ, आर्थिक अशा विषयांवर नेहमीच व्यंगचित्रे पाहावयास मिळतात. वर्तमानपत्रांतील राजकीय व्यंगचित्रे भल्याभल्यांना वाकवतात, हादरवतात. मग तो सरकारचा प्रमुख हुकूमशहा, मंत्री, नेता, पुढारी वगैरे. दुसऱ्या महायुद्धात हिटलर युरोप पादाक्रांत करीत होता, पण इंग्लंड त्याच्या हातात येत नव्हते. अक्राळ-विक्राळ हुकूमशहा हिटलरच्या भीतीने ब्रिटिश राज्यकर्ते, विचारवंत, नेते, जबाबदार नागरिक भीतीच्या ढोलीत लपून बसले होते. त्यांना आपल्या व्यंगचित्रांनी हिटलरविरुद्ध लढण्याची ईर्षा, धैर्य यांची चेतना निर्माण करीत होता व्यंगचित्रकार डेव्हिड लो व त्याचाच परिणाम म्हणून हिटलरने लो याला जिवंत वा मेलेला आपल्यासमोर आणण्याचे फर्मान सोडले. एवढी व्यंगचित्रकार व व्यंगचित्रांची ताकद आहे.



भारतामध्ये जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार झाले व आहेत. उदा. के शंकर पिल्ले- व्यंगचित्रकलेचे पितामह, आर. के. लक्ष्मण, मारियो मिरांडा, अबू अब्राहम, उन्नी वगैरे.

भारतीय व्यंगचित्रकलेची वाटचाल जोमाने चालू आहे, परंतु त्यासाठी अनेक व्यंगचित्रकारांना त्यांच्यामध्ये 'चमक' असूनही व्यासपीठ मिळत नाही. दक्षिण भारतामध्ये काही संस्था व्यंगचित्रकार व व्यंगचित्रकलेच्या उत्थानासाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्रात 'कार्टुनिस्ट्स कम्बाइन' नावाची संस्था मराठी व्यंगचित्रकारांच्या उद्धारासाठी ३०-३२ वर्षे काम करीत आहे. परंतु तिचे दुर्दैव असे की, संस्था घोळका जमविण्यासाठी असावी की, कायदेशीररीत्या योग्य व्यासपीठावर ठेवावी की एखाद्या ठेकेदाराच्या वेठीस ठेवावी यावर सतत विचारविनिमयाच्या तुपात घोळली जात आहे... अनेक वर्षे।

व्यंगचित्रकारांना त्यांच्या कलेच्या प्रसारासाठी हक्काचे व्यासपीठ, त्यांची प्रदर्शने भरावीत, परिसंवाद घडवावेत, त्यांचा मानसन्मान करावा, लोकांमध्ये व्यंगचित्रकलेसंबंधी शिक्षण जागृती, आपुलकी निर्माण करणे तसेच जागतिक व्यंगचित्रकारांना त्यांच्या व्यंगचित्रकलेचे दर्शन व आस्वाद भारतीयांना करून द्यावा, व्यंगचित्रकलेच्या स्पर्धा भरविणे ही सर्व उद्दिष्टे ठेवून संपूर्ण भारतामध्ये व्यंगचित्रकारांसाठीच असलेली आर्ट गॅलरी म्हणजे 'इंडियन कार्टून्स गॅलरी, बंगळुरु, कर्नाटक'.

८ जून २००१ साली व्यंगचित्रकार बी. व्ही. राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टूनिस्ट, बंगलोर' ही संस्था स्थापन झाली. व्ही. जी. नरेंद्र, बी.जी. गुजरप्पा व बी. एन. चंद्रकांत हे सर्व मॅनेजिंग ट्रस्टीज आणि याच वेळी भारतातील अंदाजे शंभर व्यंगचित्रकारांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. त्याच वेळी ज्येष्ठ व्यंगचित्रकारांनी व्यंगचित्रकलेसंबंधी आपले विचार मांडले व नवोदित व्यंगचित्रकारांबरोबर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रमही साकारला.

अशा प्रकारे प्रदर्शने, परिसंवाद व नामांकितांचा सन्मान असे कार्यक्रम जोमाने चालू होते, परंतु संस्थेला स्वतःची आर्ट गॅलरी नव्हती. यासाठी हात दिला तो उद्योगपती, राजकीय नेते अशोक खेनी यांनी. त्यांनी आर्ट गॅलरीसाठी कायमस्वरूपी दोन हजार चौरस फुटांची जागा निर्माण करून दिली, बेंगलोरच्या मध्यवर्ती ठिकाणी. त्या गॅलरीचे नाव 'इंडियन कार्टून गॅलरी बेंगलोर' असे करण्यात आले. १६ ऑगस्ट २००७ साली कर्नाटकचे राज्यपाल टी. एन. चतुर्वेदी यांच्या हस्ते गॅलरीचे उद्घाटन करण्यात आले.

(पान ५५ वर)

